# जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे

संपादक मंडळ
कुमार शिराळकर
डॉ. विठ्ठल मोरे
अजित अभ्यंकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
डॉ. उदय नारकर

मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे

अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ

मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे

व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे

प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com


संपादकीय

# युती व आघाडीत अखेर फूट! डाव्या शक्तींना नामी संधी!

हा अग्रलेख छपाईस जात असताना शिवसेना-भाजप युती आणि काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी या दोहोंमध्ये अखेर फूट पडून, एका माळेचे मणी असलेले हे चारही प्रस्थापित पक्ष आगामी विधानसभा निवडणुका स्वबळावर वेगवेगळे लढणार असल्याची खुशखबर नुकतीच आली आहे! महाराष्ट्रातील डाव्या लोकशाही शक्तींना आपली ताकद वाढविण्याची ही नामी संधी आली आहे!

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांसाठी जागावाटपाकरिता शिवसेना-भाजप आणि राष्ट्रवादी-काँग्रेस यांच्यात गेला महिनाभर चर्चेचे गुऱ्हाळ अखंड सुरू होते. शिवसेना आणि भाजपा यांची २५ वर्षांची युती ही गेल्या एक वर्षापासून राजू शेट्टी यांची शेतकरी संघटना, महादेव जानकर यांचा राष्ट्रीय समाज पक्ष, रामदास आठवले यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आणि विनायक मेटे यांचा शिवसंग्राम पक्ष यांच्या सहभागानंतर महायुती म्हणून मोठ्या वल्गना करत फिरत होती. ती आता पार फुटली आहे. तर सत्ताधारी काँग्रेस-राष्ट्रवादी यांच्यात अशाच वांझोट्या वाटाघाटी सुरू होत्या, त्याही आता संपल्या आहेत.

खरे तर त्यांच्यातील या भांडणांना राजकीय पक्षांतील वाटाघाटी म्हणणे म्हणजे गुंडांच्या मारामारीला वैचारिक मतभेद म्हणण्यासारखे आहे. उदाहरणार्थ, महायुती घ्या. काय होते त्यांच्यातील चर्चेचे आणि मतभेदाचे धोरणात्मक मुद्दे? काहीही नाहीत. त्यामध्ये महाराष्ट्रातील सिंचनाचा, शेतीचा, उद्योगाचा, भीषण नागरीकरणाचा, शिक्षण व आरोग्य यांच्या ढासळत्या दर्जाचा प्रश्न नाही. विदर्भाच्या मुद्द्यावरून ह्या मराठी राज्याचे तुकडे करावेत की नाहीत, यावर या चर्चेमध्येच उद्धव ठाकरे बोलले आहेत, की महाराष्ट्राची अस्मिता ही त्यांनी या युतीची एक अट म्हणून घातली आहे. ज्यांच्याशी आपली २५ वर्षे युती आहे, ते उघडपणाने स्वतंत्र विदर्भाला पाठिंबा देत असतील, तर सत्तेवर आल्यावर हे राज्य एक ठेवण्याबाबत नेमके काय होईल? आणि जर भाजपची खरोखरच तशी इच्छा असेल, तर ते ती कशी पूर्ण करू शकतील? ह्याबाबत नितीन गडकरी, उद्धव ठाकरे यांनी कधी तोंड उचकटले आहे काय? महाराष्ट्र राज्यच मुळात या महायुतीच्या राज्यात एक राहील काय? आणि भाजपच्या धोरणानुसार महाराष्ट्राचे छोट्या राज्यात तुकडे होणार असतील, तर या महाराष्ट्राच्या सन्मानाचे काय होईल, याचे उत्तर उद्धव ठाकरे देतील काय?

गांधी घराण्याच्या घराणेशाहीबद्दल अत्यंत गलिच्छ भाषेत बोलणारे शिवसेनेचे नेते ठाकरे घराण्याच्या आदित्य नावाच्या वंशाच्या दिव्याच्या अंधुक प्रकाशातच आपली वाट का शोधत आहेत? पूनम महाजन असोत की पंकजा मुंडे, या भाजपच्या नेत्यांच्याच मुलांना उघडपणे त्यांचे वारस म्हणून मागच्या दाराने गादीवर बसवित आहेत, याबाबत कधी स्पष्टीकरण देतील काय? बबनराव पाचपुते, विजयकुमार गावित यांच्यासारख्या भ्रष्टाचाराचे 'राष्ट्रवादी' मेरुमणी म्हणून ज्यांना स्वत: भाजपनेच मोजले, त्यांना भाजपमध्ये सन्मानाने प्रवेश देऊन राज्यात नवे येडियुरप्पा तयार करण्याचा कारखानाच भाजप चालवू इच्छित आहे काय? जळगाव येथील भ्रष्टाचाराच्या प्रकरणात गेली अडीच वर्षे तुरुंगात (खरे तर फाईव्ह स्टार इस्पितळात) असणारे सुरेश जैन हे ज्या शिवसेनेच्या गळ्यातील ताईत आहेत, त्या शिवसेनेला घेऊन भाजप आणि त्यांचे नेते एकनाथ खडसे कोणते राजकीय आदर्श घालून देत आहेत?

या दोन प्रबळांमधील भांडणे वाढू लागताच, रामदास आठवले आणि राजू शेट्टी यांनी सेना-भाजपच्या आश्रयाने मिंधे झालेल्या शेळ्यामेंढ्यांच्या काकुळतीने, ही युती टिकवा अशी आर्जवे करण्यास सुरुवात केली, ती फारच करुणास्पद आणि दयनीय होती.

दुसरीकडे काँग्रेस-राष्ट्रवादीमधील वाटाघाटी म्हणजे असाच एक तमाशा आहे. ते माध्यमांमार्फत वाटाघाटी करतात काय? अशी आम्हास एक शंका आहे. प्रथम नारायण राणे यांनी त्यांच्या

**राजीनाम्यावरून काँग्रेसला ब्लॅकमेल केले. तेथे त्यांना नेमकी जी काही 'अर्थपूर्ण' कामे मुख्यमंत्र्यांनी तात्काळ करण्याची अपेक्षा होती, ती झाल्यावर बहुधा त्यांचे मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्षमतेबाबत 'समाधान' झाले. आणि गेल्या ५ वर्षांच्या कारभारामुळेच काँग्रेस महाराष्ट्रात पराभूत झाली, असे जाहीर पत्रकार परिषदेत सांगणारे राणे अचानक, याच पक्षाचे निवडणूक प्रचारप्रमुख झाले. राज्यातील काँग्रेसवर इतकी दिवाळखोरीची वेळ पूर्वी कधीच आली नसावी. राष्ट्रवादीचे खरे ब्रँड ॲम्बेसेडर अजितदादा पवार यांना वाचाळ-उर्मट दादागिरीमध्ये पुरून उरणे, या एकमेव बळावर नारायण राणे यांना हे पद देण्यात आले असावे.**

**खरे तर या सर्वांतील वाटाघाटी म्हणजे महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रियेचेच अवमूल्यन आणि अध:पतन आहे. सुभेदारीने आणि भ्रष्टाचाराच्या पैशावर राजकारण करणाऱ्या या चार पक्षांचे सर्व धोरणात्मक मुद्द्यांवर एकमतच आहे. केवळ आपल्या अनुयायांनी दुसरीकडे पळू नये यासाठी त्यांची भांडणाची नाटके सुरू आहेत. उद्या लढाया झाल्याच तरी शेवटी उद्दिष्ट एकच असल्याने ते एकत्रच येणार यात शंका नाही.**

**मनसे या पाचव्या टोळीचा मात्र पूर्ण त्रिफळा स्वत: टोळीप्रमुख राज ठाकरे यांनीच उडविला आहे. उद्धव ठाकरे यांना शह देण्यासाठी निवडणूक लढविण्याची घोषणा करणारे राज ठाकरे, यांनी अचानक लोकांशी चर्चा करून आपला निर्णय फिरविला आहे. अखेर प्रत्येक निवडणुकीमध्ये एकेका बोलवित्या धन्याच्या आदेशाप्रमाणे राजकारण करणाऱ्या राज ठाकरे यांनी भाजप-शिवसेनेतील फाटणाऱ्या नात्यामध्ये आपल्याला काय संधी मिळते या आशेवरच हे केले असणार, यात शंका नाही.**

**युती व आघाडीच्या या सर्व फाटाफुटीच्या आणि चिखलफेकीच्या पार्श्वभूमीवर डाव्या लोकशाही शक्तींना आपली ताकद वाढविण्याची कधी नव्हती एव्हढी मोठी संधी आहे. यासाठी येत्या काळात या निवडणुकीत कसून आपले प्रयत्न सर्वतोपरी कसाला लावणे, हीच या क्षणाची तातडीची हाक आणि गरज आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे, महाराष्ट्र डाव्या लोकशाही समितीचे आणि इतर सर्व पुरोगामी शक्तींचे असंख्य कार्यकर्ते ही नवी संधी स्वीकारण्यास अनेकपट जास्त जोमाने व निर्धाराने रणमैदानात उतरतील हा आमचा दृढविश्वास आहे.** □□□

# चिलीच्या कम्युनिस्ट पक्षाची १०० वर्षे

चिलीचा कम्युनिस्ट पक्ष आपल्या स्थापनेची शताब्दी साजरी करीत आहे. १२ जून १९१२ रोजी चिलीच्या कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली तेव्हा तिचे नाव सोशालिस्ट वर्कर्स पार्टी असे होते. तिची स्थापना लुईस एमिलीओ रीकाबारेन याने उत्तर चिलीतील ईक्यूक्यू नावाच्या शहरात वर्कर्स अवेकनिंग असे नाव असलेल्या वर्तमानपत्राच्या कार्यालयात ३० खाणकामगार आणि इतर कामगारांच्या साथीने केली. २ जानेवारी १९२२ला झालेल्या पक्षाच्या दुसऱ्या काँग्रेसमध्ये पक्षाचे नाव बदलण्यात आले आणि कम्युनिस्ट पक्ष असे ठेवण्यात आले. त्याच वर्षी ते कम्युनिस्ट इंटरनॅशनलचे सभासदही झाले.

या शंभर वर्षांच्या संघर्षात चिली कम्युनिस्ट पक्षाला अनेक वेळा भयंकर दडपशाहीला तोंड द्यावे लागले आणि भूमिगत होऊन काम करावे लागले. अनेक सभासदांवर हल्ले झाले, त्यांना तुरुंगवास भोगावा लागला, त्यांचे खूनही झाले. प्रसिद्ध मार्क्सवादी गायक/गीतकार व्हीक्टर जारा ह्याचा मृत्यू या राजवटीने केलेल्या छळामुळेच झाला. ऑगस्टो पिनोचेटच्या १७ वर्षांच्या हुकूमशाही राजवटीत चिली कम्युनिस्ट पक्षाला भयानक अत्याचार सोसावे लागले तरीही ती राजवट कम्युनिस्ट मूल्यांना चिलीतून नष्ट करू शकलेले नाही.

चिलीचा कम्युनिस्ट पक्ष भूमिगत काम करीत असतानाच १९५२च्या अध्यक्षीय निवडणुकीत पक्षाने साल्वाडोर अलांदेला पहिल्यांदाच पाठिंबा दिला व समाजवाद्यांबरोबर त्यांनी नॅशनल लिबरेशन फ्रंट किंवा पीपल्स फ्रंट स्थापन केली. पण या निवडणुकीत तसेच १९५८च्या निवडणुकीतही या आघाडीचा पराभव झाला. परंतु पक्षाचा विस्तारही झाला आणि सहकारीही मिळाले. तेथून १९६९ पर्यंत संघर्षाची तीव्रता खूपच वाढली. आता १९७०च्या निवडणुकीसाठी 'पॉप्युलर युनिटी' नावाने आघाडी स्थापन करण्यात आली. या आघाडीचा कार्यक्रम जनसामान्यांना आकर्षून घेणारा ठरला व लोकही बुर्ज्वा पक्षांच्या खोट्या आश्वासनांना विटून गेले होते.

अलांदे जिंकले. परंतु कॉपर उद्योगाच्या राष्ट्रीयकरणाचे धोरण आणि इतरही गरिबांना फायदे देणारी धोरणे देशातील प्रस्थापितांना स्विकारार्ह असणे शक्यच नव्हते. त्यामुळे त्यांनी अमेरिकेच्या सहाय्याने व फॅसिस्ट पिनोचेटच्या नेतृत्वाखाली ११ सप्टेंबर १९७३ मध्ये रक्तरंजित कट केला व त्या कटात हजारो लोकांना मारण्यात आले, अनेकजण दिसेनासे झाले तर अनेक जणांना छळाला सामोरे जावे लागले. पक्षाचा सेक्रेटरी जनरल लुईस कोरवालनलाही तुरुंगात टाकण्यात आले आणि बऱ्याच केंद्रीय समितीच्या सभासदांना भूमिगत व्हावे लागले. त्यामुळे संघटनात्मक पातळीवर पोकळी निर्माण झाली. पिनोचेट राजवटीच्या समाप्तीपर्यंत पक्षावर बंदी घालण्यात आली.

या १०० वर्षांच्या काळात चिलीचा कम्युनिस्ट पक्ष अनेक अडथळ्यांतून मार्ग काढीत आपल्या स्वातंत्र्याचा आणि सामाजिक न्यायाचा संघर्ष पुढे नेत आहे. याची साक्ष आहेत गेल्याच वर्षी अध्यक्ष सेबेस्टीयन पिनेराच्या उजव्या सरकारला आव्हान देणारी विद्यार्थ्यांची प्रचंड निदर्शने. तरुण कम्युनिस्टांचा सेक्रेटरी जनरल कारोल कॅरीओला आणि कार्यकारी समितीची सभासद आणि सध्याची राष्ट्रीय विद्यार्थी फेडरेशनची उपाध्यक्ष कॅमिला व्हॅलेजो हे आज आघाडीवरचे नेतृत्व आहे. हजारो विद्यार्थ्यांनी मुक्त आणि चांगल्या शिक्षणाची मागणी केली. त्यांच्यावर होत असलेल्या दडपशाहीला न जुमानता हे विद्यार्थी आज आपल्या मागण्यांशी ठाम राहत संघर्ष करीत आहेत. कम्युनिस्टांनीही कामगारांच्या मागण्यांना पाठिंबा देत सरकारच्या नवउदारवादी धोरणांच्या विरोधात प्रखर निदर्शने केली तसेच घटनेत सुधारणा करण्याचीही मागणी केली. आजही पक्षाच्या या संघर्षांना जनतेतून प्रचंड पाठिंबा मिळत आहे.

□□□

# देशातील पोटनिवडणुकीचे निकाल : भाजपला दणका

**सीताराम येचुरी**

सर्वसाधारणत: पोटनिवडणुकांच्या निकालांमधून राष्ट्रीय पक्षांच्या स्थानावर फारसा स्पष्ट अभिप्राय होत नसतो. विशेषत: केंद्र सरकारमध्ये असलेल्या पक्षाच्या बाबतीत तर हे फारच खरे असते. परंतु भाजपने लोकसभा निवडणुकीत एकट्याने बहुमत प्राप्त करून केंद्रास सरकार स्थापन केल्यानंतर देशभरात तीन वेळा पोटनिवडणुका झाल्या. त्यांच्या निकालांतून मात्र जनमानसाचा काही स्पष्ट रोख दिसून येतो. या तीन वेळच्या पोटनिवडणुकांत विविध राज्यांतील विधानसभेच्या एकूण ५० मतदारसंघांत निवडणूक झाली. त्यापैकी भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएला केवळ १८ जागा मिळवता आल्या. आणि त्याही २०१४च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत या ५० मतदारसंघात त्याला तब्बल ३५ जागी मतांची लक्षणीय आघाडी मिळाली असताना, आधीच्या दोन पोटनिवडणुकांच्या तुलनेत देखील भाजपच्या मतात आता मोठी घसरण झालेली दिसते. दुसरे म्हणजे या पोटनिवडणुका ज्या राज्यांत झाल्या, ती देशातील खूप लोकसंख्या असलेली राज्ये होती, आणि लोकसभेत त्या राज्यांचे प्रतिनिधीत्वही मोठे आहे.

लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशात भाजपला ८० पैकी विक्रमी ७१ जागा मिळाल्या होत्या. सत्तेवर येऊन १०० दिवस झाले नाहीत तोवरच भाजपने मागील विधानसभा निवडणुकीत जिंकलेल्या ८ जागा या निवडणुकीत गमावल्या. लोकसभा निवडणुकीतही या पैकी ७ विधानसभा मतदारसंघात त्याला मोठे मताधिक्य मिळाले होते. गुजरातमध्ये लोकसभा आणि आधीच्या विधानसभेच्या जागांच्या तुलनेत ३ जागा भाजप गमावून बसला. आता पोटनिवडणुकीत देशभर ३२ विधानसभा मतदारसंघात निवडणूक झाली. त्यापैकी भाजप कशाबशा १२ जागा जिंकू शकला.

सार्वत्रिक निवडणुकांनंतर इतक्या कमी अवधीत भाजपच्या मतात जी घसरण झाली त्यावर देशातील सर्वच प्रसारमाध्यमांनी आपले टीकात्मक अभिप्राय व्यक्त केले. तिकडे दुर्लक्ष करून भाजप आपण प. बंगालच्या विधानसभेत प्रवेश केला म्हणून स्वत:ची पाठ थोपटून घेण्यात मशगुल आहे.या आधी त्याने तृणमूल काँग्रेस आणि इतर काही पक्षांशी आघाडी करून प. बंगालमध्ये लोकसभा आणि विधानसभेच्या जागा मिळवल्या होत्या, आता मिळालेल्या बशीरहाट या मतदारसंघात भाजपला २०१४च्या लोकसभा निवडणुकीत ३०,००० मतांचे आधिक्य मिळाले होते. आता त्याचे मताधिक्य आहे केवळ १३००हून कमी. हा मतदारसंघ बांगला देशाच्या हद्दीला लागून असल्याने तो नेहमीच धार्मिक तणावाच्या दृष्टीने संवेदनशील राहिला आहे. त्याचा फायदा घेत भाजपने लोकसभा आणि पोटनिवडणुकीत धार्मिक उन्माद निर्माण करायचा प्रयत्न केलाच.

त्याशिवाय, प. बंगालमधील सामान्य कष्टकरी जनता तृणमूल काँग्रेसच्या हिंसक, दहशतवादी, धाक-दपटशहाच्या गुंड राजकारणापासून संरक्षण मिळण्यासाठी भाजप केंद्रात सत्तेत आल्याने त्या पक्षाकडे आशेने पहाते. या आणि इतर काही कारणांनी मतदार भाजपकडे झुकले. बशीरहाट विधानसभा मतदारसंघ १९७७ पासून माकप आणि डाव्या आघाडीकडे राहिलेला आहे. माकपचे तेथील विद्यमान आमदार अत्यंत लोकप्रिय होते. दुर्दैवाने त्यांचे निधन झाल्याने ही जागा रिकामी झाली आणि तेथे पोटनिवडणूक घ्यावी लागली. येथे झालेल्या पिछेहाटीची कारणमीमांसा खोलात जाऊन करण्याची ग्वाही माकप आणि प. बंगालच्या डाव्या आघाडीने दिली आहे.ते काही असले तरी तृणमूल काँग्रेसनेच भाजपला राज्याच्या राजकारणात शिरकाव करून दिला आहे हे विसरता कामा नये. भाजप-तृणमूल आघाडी झाल्यानेच तृणमूलच्या प्रमुख नेत्या वाजपेयी सरकारमध्ये रेल्वे मंत्री होऊ शकल्या. डाव्या आघाडीचा पराभव करायच्या ईर्षेपोटी तृणमूलने एका बाजूने जमातवादी शक्तींना आणि दुसऱ्या बाजूने माओवादी हिंसाचार आणि दहशतवादाला प. बंगालचे दरवाजे सताड खुले करून दिले. परिणाम ? तृणमूलने सत्ता काबीज करून बंगाली जनतेला हालाखीत ढकलून दिले. प. बंगालमध्ये पिढ्यानपिढ्या धार्मिक सलोखा नांदत होता. धार्मिक तणाव ही भूतकाळात लुप्त झालेली बाब बनली होती. तृणमूलच्या कृपेने ते भूत बंगाली जनतेच्या मानगुटीवर बसू पहात आहे.


या सर्व गदारोळात अनेकजणांनी एका महत्त्वाच्या घटनेकडे सोयीस्कर आणि हेतूपूर्वक दुर्लक्ष केले आहे. माकपचे त्रिपुरातील दणदणीत यश. तेथील माकपचे विद्यमान आमदार २०१४च्या लोकसभा निवडणुकीत खासदार म्हणून निवडून आल्याने ती जागा रिकामी झाली होती. ही जागा माकपने विक्रमी मतांनी पुन्हा जिंकली. इतकेच नव्हे तर, त्याने इतर सर्व उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त केल्या. भाजप आणि तृणमूल या दोघांनीही माकपला विरोध करायचा खूप आटापिटा केला तरी त्यांची डाळ काही शिजली नाही.

उत्तर प्रदेश, राजस्थान आणि गुजरातमधील निकाल हा जनतेने भाजपला दिलेला इशारा आहे एवढेच म्हणून राष्ट्रीय प्रसारमाध्यमे थांबलेली नाहीत. या निकालांचे वृत्त देताना 'टाइम्स ऑफ इंडिया'ने दिलेले शीर्षक मोठे मार्मिक आहे : 'After the landslide, a slide'.थोडक्यात, घबाडानंतर भाजपच्या गोटात घसरण आणि घबराट, 'मेल टुडे' दैनिकाने मथळा दिला 'भाजपला पोटधक्का'. अनेक वृत्तपत्रांनी आपल्या अग्रलेखांतून भाजपच्या या पराभवाचे विश्लेषण करताना अनेक कारणे दाखवून दिली. पण सर्वांचा निष्कर्ष एकच होता: भाजपला जनतेने इशारा दिला आहे. या निकालांवर काही निरीक्षणे नोंदवण्यापूर्वी त्याचा आम्ही सखोल अभ्यास करू अशी मखलाशी करून भाजपने मूल्यमापन करण्यापासून पळ काढला आहे. बहुतेक वृत्तपत्रांनी आणि विश्लेषकांनी भाजपने धार्मिक ध्रुवीकरणासाठी केलेल्या 'लव्ह जिहाद'सारख्या घोषणांनी तो पक्ष तोंडघशी पडला, असा निष्कर्ष काढला आहे. तथापि, याच वृत्तपत्रांना कित्येक रा.स्व. संघ-भाजपच्या नेत्यांनी नाव उघड न करायच्या अटीवर (मोदी राजवटीत ही प्रवृत्ती चांगलाच जोर धरू लागली आहे) सांगून टाकले की, 'लव्ह जिहाद'सारख्या घोषणा आणि मुझफ्फरनगर, सहारनपूर आणि मोरादाबाद येथील धार्मिक दंगलींना निवडणुकीतील प्रश्न न केल्याने भाजपला मोठी

*(पान १४ पहा)*

# कॉ. हरेकृष्ण कोनार यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने लोकशाही रक्षणाचे आवाहन

**बिमान बसू**



साम्राज्यवादविरोधी लढ्यासाठी आणि प्रचलित जुलुमी समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी कॉम्रेड हरेकृष्ण कोनार यांनी आपले पुरे आयुष्य वेचले होते. मार्क्सवादी-लेनिनवादी विचारप्रणालीवर अढळ निष्ठा हीच त्यांच्या आयुष्याची प्रेरणा होती. सरंजामशाहीच्या मगरमिठीतून शेतकऱ्यांची आणि शेतमजुरांची सोडवणूक करण्यासाठी कॉ. कोनार त्यांच्या चळवळींमध्ये नेहमी अग्रेसर राहिले होते.

पश्चिम बंगालच्या बर्धमान जिल्ह्यातील मेमारी गावी ५ ऑगस्ट १९१५ रोजी कॉ. कोनार यांचा जन्म झाला व २३ जुलै १९७४ साली वयाच्या ५९ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनानंतर माकपच्या पॉलिटब्यूरोने पाठविलेल्या शोकसंदेशात म्हटले होते. 'आपले संपूर्ण जीवन कॉ. कोनार यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी, लोकशाहीच्या रक्षणासाठी आणि समाजवादासाठी वाहिले होते.'

विद्यार्थीदशेपासूनच देशाच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये त्यांचा निष्ठापूर्वक सहभाग होता. १९३० सालच्या असहकार चळवळीमध्ये भाग घेतल्याबद्दल, वयाच्या केवळ १५व्या वर्षी त्यांना अटक झाली होती. एका सुखवस्तु कुटुंबातून आलेल्या कॉ. हरेकृष्ण कोनारनी, आपल्या वडिलांची पैशाची मोठी पेटी तोडून क्रांतिकारी चळवळीसाठी रक्कम उभी केली होती. हे त्यांनी मला सांगितल्याचे आठवते. मातृभूमीवरचे प्रेम त्यांच्या नसानसात भिनले होते.

ब्रिटिश वसाहतवादी राजवटीच्या विरोधातील, 'युगांतर' या क्रांतिकारी गटाचा एक सभासद म्हणून कॉ. कोनार यांनी आपले राजकीय कार्य सुरू केले होते. १९३० साली तुरुंगात असताना त्यांचा परिचय 'युगांतर'च्या बिनॉय चौधरी या एका खंद्या समर्थकाशी झाला. बर्धमान जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांमध्ये, मीरत-कटाच्या प्रकरणामुळे नवे चैतन्य निर्माण झाले होते. कॉ. बंकीम मुखर्जी आणि भूपेंद्रनाथ दत्त यांच्या या जिल्ह्याला वारंवार भेटी होत असत. त्यामुळे मार्क्सवादी-लेनिनवादी विचारधारा हळू हळू जिल्ह्यातील क्रांतिकारकांच्या मनाची पकड घेऊ लागली होती. भारतामधून ब्रिटिश सत्तेचे उच्चाटन करण्यासाठी 'युगांतर' क्रांतिकारकांच्या काही हालचाली चालू असल्याची खबर पोलिसांना मिळताच, त्यांनी कॉ. कोनार यांना व इतर क्रांतिकारकांना १९३२ साली अटक केली. त्या सर्वांना अंदमानच्या कोठडीत धाडण्यात आले. तुरुंगवासात असतानाच कॉ. कोनार मार्क्सवाद-लेनिनवादामुळे इतके भारावून गेले की ते त्यावेळच्या 'कम्युनिस्ट कन्सॉलिडेशन'(communist Consolidation) या संघटनेचे सभासद बनले. ही विचारसरणी त्यांच्यासाठी मार्गदर्शक शक्ती बनली.

१९३८ साली त्यांनी तुरुंगातून सुटल्यानंतर कॉम्रेड, कम्युनिस्ट पक्षाचे सभासद झाले आणि त्यानंतर त्यांनी स्वत:ला क्रांतिकारक चळवळीमध्ये, शेतकरी आंदोलनांमध्ये आणि पक्षाच्या कामांमध्ये झोकून दिले. कोलकाता आणि हावडा येथील पक्षाच्या कामांमध्ये ते सक्रियपणे भाग घेऊ लागले. 'कनाल टॅक्स' या त्यावेळी लादण्यात आलेल्या कराच्या विरोधातले आंदोलन मजबूत करण्यासाठी कॉ. कोनारना बर्धमान जिल्ह्यामध्ये पाठविण्यात आले होते. त्याकाळी काँग्रेसमध्ये राहूनच कम्युनिस्ट काम करीत असत. कोलकाता, बर्धमान, हावडा आणि हुगळी या जिल्ह्यांतील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांशी सातत्याचा संपर्क ठेवण्याची जबाबदारी कॉम्रेड कोनार यांच्यावर सोपविण्यात आली होती. या सुसंधीचा फायदा घेऊन काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मनावर डावी विचारसरणी बिंबविण्याचा ते प्रयत्न करीत. त्यानंतरच्या काळात प्रामुख्याने बर्धमान जिल्ह्यातील पक्षाच्या कामावर त्यांनी आपले लक्ष केंद्रीत केले, विशेषत: या जिल्ह्यातील शेतकरी आंदोलनाला आकार देण्यात कॉ. कोनार यांचा पुढाकार होता. कालांतराने पश्चिम बंगालमध्येच नव्हे तर संपूर्ण देशातील शेतकरी चळवळीचे ते अग्रणी बनले.

१९४० साली बर्धमान जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील, कॉ. कोनार यांच्या हालचालीवर ब्रिटिश सरकारने बंदी घातली. १९४४ सालचे, 'अजय' नदीवरील धरणाचे आंदोलन कॉ. कोनार यांच्या नेतृत्वाखाली सुरू झाले होते. १९४४ ते १९४८च्या दरम्यान कॉ. कोनार कम्युनिस्ट पक्ष आणि किसान सभा यांच्या कामांमध्ये फार व्यस्त होते. २६ मार्च १९४८ ला कम्युनिस्ट पक्षावर बंदी घालण्यात आली; कॉ. कोनार यांना अटक झाली व ३ महिन्यांनंतर त्यांची सुटका झाली. त्यानंतर १९५२ पर्यंत भूमिगत राहून कोनार यांनी पक्षाचे काम केले.

बर्धमान जिल्ह्याच्या 'मेमारी कलना' या विधानसभा मतदारसंघातून कॉ. कोनार १९५७ साली निवडून आले व १९६२ साली 'कलना' विधानसभा मतदार संघातून निवडून आले. १९६७ साली याच

मतदारसंघातून त्यांची पुन्हा निवड झाली व पहिल्या 'संयुक्त आघाडी सरकारमध्ये ते जमीन-महसूल मंत्री झाले. बड्या जमीनदारांच्या कब्जात असलेली अतिरिक्त जमीन ('जमीनमर्यादा' कायद्यानुसार अधिक) आणि 'बेनामी' (खोट्या नावाखाली असलेली) जमीन ताब्यात घेण्यात मंत्री म्हणून कॉ. कोनार यांनी मोठी भूमिका बजावली होती. पहिले संयुक्त आघाडी सरकार नऊ महिनेच टिकले. १९६९ साली कोनार पुन्हा एकदा 'कलना' विधानसभा मतदारसंघातून निवडून आले व दुसऱ्या संयुक्त आघाडी सरकारमध्ये जमीन महसूल मंत्री झाले. त्यांच्या या दुसऱ्या कार्यकाळातही अतिरिक्त जमिनीप्रमाणे बेनामी जमिनी ताब्यात घेण्यात त्यांचा पुढाकार होता.

कॉ. हरेकृष्ण कोनार एक उत्तम वक्ते होते. सार्वजनिक सभांमधील त्यांची भाषणे लोक अक्षरश: मंत्रमुग्ध होऊन ऐकत.

शेतकरी आंदोलनाच्या या पुढाऱ्याला आणि जनआंदोलनांच्या या लोकनेत्याला, ब्रिटिश सरकारच्या पोलिसांनीच नव्हे, तर स्वतंत्र भारताच्या पोलिसांनीसुद्धा अनेकदा तुरुंगात डांबले होते. अटक टाळण्यासाठी कॉ. कोनार बरेचदा भूमिगत राहून काम चालू ठेवीत. 'भारत संरक्षण कायद्या'खाली (Defence of India Act) खाली त्यांना१९६२ साली अटक झाली; एका वर्षानंतर त्यांची सुटका झाली होती. पुन्हा १९६४ साली याच कायद्याखाली त्यांना अटक केल्यामुळे कोलकात्याला त्याच साली भरलेल्या ७व्या पक्ष काँग्रेसला त्यांना जाता आले नव्हते.

या इथे नमूद करण्यासारखी गोष्ट ही की, १९५९-६२ सालच्या भारत-सीमा तंट्याच्या दरम्यान, संकुचित मानसिकतेच्या राष्ट्रवाद्यांनी जेव्हा भारतीय कम्युनिस्टांवर हल्ला चढविला तेव्हा कोनार यांनी बिनतडजोड भूमिका घेतली होती. एकंदरीतच दुरुस्तीवादाविरोधात त्यांनी घेतलेल्या खंबीर, करारी भूमिकेमुळे, त्या काळीसुद्धा कोनार अविभक्त कम्युनिस्ट पक्षाच्या प्रमुख नेत्यांपैकी एक प्रमुख नेते म्हणून ओळखले जाऊ लागले होते. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना होण्यापूर्वी कोनार यांनी पक्षाच्या स्थापनेमध्ये संस्थापक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली होती.

तसेच नंतरच्या काळात पक्षामध्ये दिसून आलेल्या नक्षलवादी, डाव्या साहसवादी प्रवृत्तींना कठोर विरोध करून, मार्क्सवादी-लेनिनवादी सिद्धातांना उचलून धरण्यासाठी, त्यांनी पक्ष पातळीवर निग्रही वैचारिक लढा दिला होता. त्यांच्या या योगदानामुळे १९६४च्या ७व्या पक्ष काँग्रेसमध्ये पक्षाच्या केंद्रीय कमिटीवर ते निवडून आले. त्यानंतर १९६८ साली कोचीला भरलेल्या ८व्या पक्ष काँग्रेसमध्ये आणि १९७२ साली मदुराईला भरलेल्या ९व्या पक्ष काँग्रेसमध्ये त्यांची पुन्हा एकदा केंद्रिय कमिटीवर निवड झाली. १९६९ साली मदुराईला भरलेल्या 'अखिल भारतीय किसान सभे'च्या राष्ट्रीय परिषदेमध्ये ते 'अखिल भारतीय किसान सभे'च्या महासचिवपदी निवडून आले. तसेच १९७१ आणि १९७३ सालच्या राष्ट्रीय परिषदांनी त्यांना पुन्हा अखिल भारतीय किसान सभेच्या महासचिवपदी निवडून दिले. आयुष्याच्या अखेरीपर्यंत या पदाच्या जबाबदाऱ्या त्यांनी निष्ठेने पार पाडल्या. अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांमध्येही त्यांचा वैशिष्ट्यपूर्ण सहभाग असे. चीन आणि व्हिएतनामला गेलेल्या प्रतिनिधीमंडळाचे ते सदस्य होते.

तरुण, उत्साही, क्रियाशील कॉम्रेड्सबद्दल कॉ. कोनार यांना जिव्हाळा वाटे. त्यांना जवळून पाहण्याची संधी मला मिळाली होती. १९७१ साली मी माझे घर सोडून बाहेर पडलो तेव्हा मध्य-कोलकात्यातील किसान सभेच्या कार्यालयासमोरच्या एका घराच्या, न वापरलेल्या स्वयंपाकगृहात मी राहत असे. कॉ. कोनार त्यांच्या कुटुंबियांसहित घराच्या दुसऱ्या मजल्यावर राहत. जवळजवळ वर्षभर त्या जागी राहिल्यानंतर मी जेव्हा क्षयरोगाने आजारी पडलो तेव्हा कोलकात्याच्या पक्ष कार्यालयात काम असलेल्या प्रत्येक वेळी कॉ. कोनार माझ्या घरी मला भेटण्यासाठी रोज येत. दुसऱ्यासाठी सहानुभूती आणि आपुलकी असलेले, परोपकारवृत्तीचे कॉ. कोनार मी पाहिले आहेत.

कॉ. कोनार एका असाध्य दुखण्याने आजारी होते. परंतू तरीही आपली शारीरिक आणि मानसिक व्यथा त्यांनी कधीही कामाच्या आड येऊ दिली नाही. पक्ष-संघटन मजबूत करण्यासाठी आणि शेतकरी आंदोलने विस्तृत करण्यासाठी ते देशभर फिरत असत. शेतकरी आंदोलनांमध्ये ते नेहमी समरस होत. कॉ. कोनार यांचे निधन झाले तेव्हा कॉ. ज्योती बसू म्हणाले होते, 'कॉ. हरकृष्ण कोनार मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय स्तरावरील नेते होते. शेतकरी आंदोलने संघटीत करण्याची खास जबाबदारी पक्षाने त्यांच्यावर सोपविली होती. शेतकऱ्यांचे प्रश्न नीटपणे समजून घेतल्यानंतर कॉ. कोनार ते प्रश्न सोप्यारितीने लोकांना समजावून सांगत. शेतकऱ्यांच्या समस्या केवळ त्यांच्या समस्या नाहीत आणि त्या सोडविल्या नाहीत तर गरीब जनतेचे प्रश्न कधीही सोडविता येणार नाहीत. हे कॉ. कोनार यांनी लोकांना पटवून दिले. काही न करता, व्यर्थ बसून राहिल्याचे आम्ही त्यांना कधीच पाहिले नाही. ते कुणी वकील नव्हते, ना बॅरिस्टर. परंतु शेतीविषयक कायद्याबद्दल त्यांचे विचार स्फटिकासारखे स्पष्ट होते. अधिकाऱ्यांच्या चुका किंवा त्यांचे दोष कॉम्रेडच्या लगेच लक्षात येत असत. शेतकऱ्यांच्या आणि गावकऱ्यांच्या समस्यांची जाणीव त्यांना होतीच; शिवाय त्यांना काय हवे याचीही त्यांना चांगली समज होती.'

कामगारवर्गाच्या नेतृत्वाखाली, शेतकरी आणि कामगार यांची मजबूत एकजूट बांधून ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या जुलूमांतून आणि जाती-आधारित अत्याचारांतून जनतेला मुक्त करण्यासाठी या खंबीर नेत्याने अथक परिश्रम घेतले होते. आणि म्हणूनच त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने शेतकरी आणि कामगारांच्या एकजुटीचे प्रयत्न नेटाने चालू ठेवण्याचा निर्धार आपण करूया. कॉ. हरेकृष्ण कोनार यांच्यासाठी हीच सर्वश्रेष्ठ आदरांजली आहे.

कम्युनिस्ट एका विशिष्ट मातीचे बनलेले असतात; मार्क्सवादी-लेनिनवादी विचारधारा आणि नव्या समाजासाठी संघर्ष करण्याची मनोवृत्ती या मूल्यांवर त्यांचा अढळ विश्वास असतो, तसेच मार्क्सवाद-लेनिनवादाचे सिद्धांत वेगवेगळ्या देशांमधील परिस्थितीनुसार लागू करणे महत्त्वाचे असते, हे कॉ. कोनार यांनी स्वत:च्या जीवनातून दाखवून दिले आहे. त्यांनी घालून दिलेल्या धड्यांतून येणाऱ्या पिढीला बरेच काही शिकण्यासारखे आहे.


कॉ. हरेकृष्ण कोनार यांचा जन्मशताब्दी सोहळा शेतकरी संघटना साजरा करणार आहेत. या प्रसंगी शेतकरी आणि शेतमजूर यांची भक्कम एकजूट बांधून जोमदार आंदोलने उभी करण्याची प्रतिज्ञा करणे महत्त्वाचे आहे. लोकशाहीवर आणि लोकशाही हक्कांवर, पश्चिम बंगालमध्ये सध्या चालू असलेल्या हल्ल्यांच्या विरोधात नेटाने लढा देण्यासाठी ही शेतकरी आंदोलने उपयुक्त ठरतील व अशाप्रकारे लढ्यांमधूनही आपण कॉ. हरेकृष्ण कोनार यांना सन्माननीय श्रद्धांजली देऊ शकतो.

**कॉ. हरेकृष्ण कोनार लाल सलाम!**

**(अनुवाद : शोभा ठेकेदत्त)**

# बिपीन चंद्र : श्रद्धांजली

**प्रा. इर्फान हबीब**



बिपीन चंद्र या ख्यातनाम विचारवंतांचे ३० ऑगस्ट २०१४ रोजी निधन झाले. बिपीन चंद्र हे भारतातील एक आघाडीचे इतिहासतज्ज्ञ होते. धर्मनिरपेक्षता आणि वैज्ञानिक जाणिवेवर त्यांची ठाम निष्ठा होती. देशातील सर्वच वृत्तपत्रे आणि प्रसारमाध्यमांनी त्यांच्या निधनाच्या वृत्ताला ठळक प्रसिद्धी दिली. त्यांना श्रद्धांजली वाहून त्यांच्यावर प्रदीर्घ मृत्युलेख लिहिले. हे साहजिकच होते. बिपीन चंद्रांच्या निधनाने केवळ देशातील अभ्यास आणि अभ्यासकांचे नुकसान झालेले नाही, तर देशाच्या विचारविश्वाचेच नुकसान झालेले आहे.

बिपीन चंद्र यांचा जन्म आता हिमाचल प्रदेशमध्ये असलेल्या कांगडा येथे १९२८ साली झाला. कांगडा त्या वेळी पंजाबमध्ये होते. त्या वेळच्या पंजाबमध्ये रूढ असलेल्या प्रथेनुसार त्यांचे प्राथमिक शिक्षण उर्दूमध्ये झाले. त्यांनी उर्दूत चांगले प्राविण्य मिळवले होते. 'लहानपणी मला उर्दू कांदबऱ्या वाचायला खूप आवडत असत', असे ते मला एकदा म्हणाले होते. त्यांनी लाहोरच्या फोर्म ख्रिश्चन कॉलेजमधून पदवी घेतली, पण फाळणीमुळे त्यांना लाहोर सोडावे लागले. त्यानंतर ते अमेरिकेत कॅलिफोर्नियातील स्टॅनफर्ड विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षणासाठी गेले. तेथे त्यांचा काही कम्युनिस्टांशी संबंध आला आणि कम्युनिस्ट म्हणून ते सिनेटर मॅकार्थी यांच्या सरकारी छळवादाचे बळी ठरले. त्यांना सक्तीने भारतात परत पाठवण्यात आले.

दिल्लीला परतल्यावर त्यांची हिंदु कॉलेजमध्ये इतिहासाचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. माझी त्यांची पहिली भेट १९५९ साली झाली. पण दिल्लीला नव्हे, तर अलिगडला. ते आपल्या काही मार्क्सवादी मित्रांच्या सहकार्याने 'इन्क्वायरी' हे नियतकालिक सुरू करायच्या प्रयत्नात होते. त्या कामात आम्ही त्यांना मदत करावी, या हेतूने ते आम्हाला भेटायला आले होते. त्या नियतकालिकात केवळ मार्क्सवादी नव्हे तर इतर विचाराचे समाजशास्त्रावरील गंभीर लेखही यावेत, असे त्यांचे मत होते.

स्वत: बिपीन चंद्र त्यावेळी पी.एच.डी.चा प्रबंध लिहिण्यासाठी संशोधन करत होते. तो प्रबंध पुढे नवी दिल्लीच्या पीपल्स पब्लिशिंग हाऊसने १९६६ मध्ये 'भारतातील आर्थिक राष्ट्रवादाचा उगम आणि विकास (१८८०-१९०५)' या नावाने प्रकाशित केला. त्या ग्रंथात त्यांनी त्या विषयातील अत्यंत मूलभूत स्वरूपाचे काम केले होते. नुकत्याच जन्माला आलेल्या राष्ट्रवादी विचारवंतांनी ब्रिटीश साम्राज्यशाहीतून निर्माण झालेल्या आर्थिक प्रश्नांचा कसा विचार केला, याची सांगोपांग चर्चा केली होती. देशातील विविध भाषांतील वृत्तपत्रे आणि नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेली प्रचंड माहिती आणि आकडेवारी त्यांनी जमा केली. ते काम अचाट होतेच पण त्यांची विश्लेषणाची क्षमताही विलक्षण असल्याचे त्या ग्रंथातून दिसून आले. त्यांची विश्लेषक नजर अत्यंत स्वच्छ होती.

कॉ. ई. एम. एस. नंबुद्रिपाद हे बौद्धिक विषयांत सहजासहजी समाधान होणारे गृहस्थ नव्हते, हे सर्वश्रुत आहे. पण त्यांनीही पीपल्स डेमॉक्रसीच्या १४ ऑगस्ट १९६६ च्या अंकात त्या ग्रंथाचे मनापासून स्वागत करणारा लेख लिहिला होता. तरीही त्या लेखात त्यांनी बिपीन चंद्रांनी राष्ट्रीय नेत्यांच्या वर्गीय भूमिकेकडे पुरेसे लक्ष दिले नसल्याचा आक्षेप नोंदवला होता. पण या बाबतीत बिपीन चंद्रांचे समर्थन करणे शक्य आहे. जेव्हा जेव्हा वर्ग आणि चळवळ यांचा थेट संबंध आला, तेव्हा तेव्हा त्यांनी तो स्पष्टपणे दाखवून दिला होता. उदाहरणार्थ फॅक्टरी कायद्याविषयी राष्ट्रवादी नेत्यांच्या भूमिकेचा त्यांनी घेतलेला परामर्ष, त्यांनी राष्ट्रवाद्यांच्या इतर भूमिकांतील हा वर्गीय आशय दाखवला नाही. याचे कारण तो इतका स्पष्ट नव्हता आणि तसा दाखवणे हे कल्पनारंजन ठरले असते.

साम्राज्यवादी अर्थनीतीची भारतीय समीक्षा ही खूप व्यापक होती आणि त्या समीक्षेने भारतीय राष्ट्रवादी आंदोलनाला एक धारदार वैचारिक शस्त्र उपलब्ध करून दिले. त्या बरोबरच या समीक्षेमुळे राष्ट्रवादी आंदोलनाला केवळ मध्यमवर्गालाच नव्हे तर भारतातील सर्व प्रदेशातील आणि धर्मातील गरीबांना आवाहन करता आले. बळकट पुराव्यांच्या आधारे केलेली ही मांडणी हे माझ्या दृष्टीने या ग्रंथाचे शक्तीस्थान आहे आणि ते ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे ठरले आहे.

वसाहतवादाने भारतात निर-औद्योगिकीकरणाची प्रक्रिया सुरू करून दिली होती. देशातील औद्योगिक प्रक्रिया नष्ट होणे, हा राष्ट्रवादासाठी मोठा चिंतेचा विषय होता. वसाहतवाद भारतातील उद्योग नष्ट करत आहे, आणि त्याचे शोषण करत आहे या मांडणीवर मॉरीस डी. मॉरीस या अमेरिकन विद्वानाने टीका केली होती. त्याच्या या टीकेला कडवे प्रत्युतर देणारा परखड लेख १९६८च्या 'इंडियन इकॉनॉमिक ॲण्ड सोशल हिस्टरी रिव्ह्यू' या नियतकालिकामध्ये बिपीन चंद्रांनी लिहिला होता. या लेखाने खूप लोकांना प्रभावीत केले होते आणि माझेच सांगायचे तर एकोणीसाव्या शतकातील भारताच्या आर्थिक इतिहासासंबंधीच्या माझ्या विचारांचा उगम बिपीन चंद्रांच्या या लेखात सापडतो.

१९६०चे दशकभर 'इन्क्वायरी' या नियतकालिकाचे प्रेरणास्थान होते बिपीन चंद्रच. या कालखंडात मार्क्सवादी अभ्यासक आणि विचारवंतात अनेक मतभेद निर्माण झाले होते. 'इन्क्वायरी'च्या माध्यमातून बिपीन चंद्रांनी या मतभेदातील मुद्दे स्पष्ट करून देण्याची मोठीच कामगिरी पार पाडली. दरम्यान, दिल्लीला जवाहरलाल नेहरू विद्यापीठ स्थापन झाले आणि बिपीन चंद्र त्या विद्यापीठातील 'सेन्टर फॉर हिस्टोरिकल स्टडीज'मध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले. जवाहरलाल नेहरू विद्यापीठात एकाच टेबलाशी प्राध्यापक आणि शिपाई एकत्र बसू शकतील, अशी संस्कृती रुजवण्याची मनीषा त्यांनी माझ्याजवळ बोलून दाखविली होती. वास्तव हे स्वप्नाहून खूपच गुंतागुंतीचे असते. हे खरेच. तरीही भारतातील इतर विद्यापीठांहून जेएनयूमधील वातावरण कितीतरी जास्त लोकशाही आणि समता जोपासणारे बनले, आणि त्याचे खरे श्रेय जाते तेथे या शिक्षणसंस्कृतीचा पाया घालणाऱ्या बिपीन चंद्रांच्या स्वप्नाळू, आदर्शवादी पिढीला.

१९७०च्या दशकात बिपीन चंद्रांनी आपल्या अंगावर घेतलेले एक प्रमुख काम म्हणजे NCERT साठी आधुनिक भारताच्या इतिहासावर लिहिलेले शालेय क्रमिक पुस्तक. हे क्रमिक पुस्तक म्हणजे विद्यार्थ्यांसाठी इतिहास कसा लिहावा याचा वस्तुपाठच होय. भारताच्या इतिहासावर वसाहतीचा आणि स्वातंत्र्य लढ्याचा काय परिणाम झाला हे त्यांनी अत्यंत सुस्पष्ट रीतीने दाखवून दिले आहे. तसेच इतिहासाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अंगांचा वेध घेत त्यांनी देशातील एक प्रदेशही नजरेआड होऊ दिलेला नाही. १९७७ साली प्रकाशित झालेल्या या पुस्तकावर रा.स्व. संघ आणि त्याच्या इतर संघटनांनी विखारी हल्ला चढवला आणि २००१ मध्ये सत्तेवर आलेल्या भाजप सरकारने ते अभ्यासक्रमातून काढून टाकले. तथापि, ते पुस्तक २००९ मध्ये पुन्हा प्रकाशित करण्यात आले.

१९७० च्या दशकात फोफावणाऱ्या जमातवादाविषयी बिपीन चंद्रांना कमालीची चिंता वाटू लागली. जमातवादाची सावली दिसली तरी बिपीन चंद्र त्याच्याविरुद्ध आयुष्यभर लढत आलेले होते. १९८४ मध्ये त्यांचा 'कम्युनॅलिझम इन मॉर्डन इंडिया' हा निबंधसंग्रह प्रकाशित झाला. जमातवादाविषयी मांडणी करत असतानाच त्यांनी भारतीय राष्ट्रीय आंदोलनाचे पुनर्मूल्यमापन करायला सुरुवात केली. त्याची पहिली मांडणी त्यांनी १९८५ मध्ये अमृतसरला भरलेल्या 'इंडियन हिस्टरी काँग्रेस'समोर केलेल्या अध्यक्षीय भाषणातून केली. या मांडणीतून त्यांनी गांधींच्या नेतृत्वावर कम्युनिस्ट करत असलेल्या टीकेचा प्रतिवाद केला होता. कम्युनिस्टांच्या मते गांधींचे नेतृत्व तडजोडवादी होते. बिपीन चंद्रांनी गांधींच्या रणनीतीचा 'संघर्ष-तह-(वरच्या स्तरावरचा) संघर्ष' असा अन्वयार्थ लावला. 'मागाहून केलेले समर्थन' असा या मांडणीचा अर्थ लावणे शक्य आहे.पण त्या भाषणाचा एक श्रोता म्हणून एक गोष्ट मला नि:संदिग्धपणे सांगायला हवी. बिपीन चंद्र आपली भूमिका अत्यंत गांभीर्याने आणि प्रामाणिकपणे मांडत होते.

त्यांचे आणि डाव्यांचे मार्ग स्पष्टपणे भिन्न झाले ते याच कालखंडात. जेएनयूच्या 'स्टडीज इन हिस्टरी' या नियतकालिकाने १९८१ मध्ये प्रकाशित केलेला 'द लेफ्ट इन इंडिया' हा निबंधाचा खंड माझ्या पाहण्यात आला आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला. त्यातील आठही निबंधांत भारतीय कम्युनिस्टांच्या पहिल्यापासूनच्या कामगिरीवर कडाडून टीका केलेली होती. स्वत: बिपीन चंद्रांच्या १४० पानांचा प्रदीर्घ टीकात्मक लेखही त्यात समाविष्ट होता. त्या वेळी बिपीन चंद्र आणि त्यांच्या पत्नी उषा यांनी दिलेल्या चायनीज जेवणाचा स्वाद घेत असताना मी या लेखावर माझे निषेधपर मत व्यक्त केले. त्यांनी किमान एखाद्या कम्युनिस्ट विचारवंताला आपली बाजू मांडायला त्या खंडात लेख लिहिण्यासाठी आमंत्रित करायला हवे होते, असे मी म्हणालो. आपल्या विनम्र स्वभावानुसार त्यांनी माझ्याशी वाद घातला नाही. पण पुढे बिपीन चंद्रांनी १९८७ मध्ये संपादित केलेल्या 'इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेन्डन्स, १८५७-१९४७' या ग्रंथात जास्त संतुलित भूमिका मांडली. अत्यंत वाचनीय शैलीत लिहिलेला हा ग्रंथ या काळातील भारतीय इतिहासाचे सम्यक दर्शन देतो.

बिपीन चंद्र नेहमीच वर्तमानाची संगती भूतकाळाशी लावून पहात आणि त्यामुळे ते वर्तमानातील घटनांविषयी अत्यंत संवेदनशील असत. १९७५ मध्ये इंदिरा गांधींनी जाहीर केलेल्या आणीबाणीच्या आधी जयप्रकाश नारायणांनी पुकारलेल्या 'संपूर्ण क्रांती' आंदोलनानेही ते चिंतीत झाले होते. ते आंदोलन 'घटनाविरोधी' होते असे त्यांचे मत होतेच, शिवाय त्याला जमातवादी शक्तींचे मोठे पाठबळ मिळाल्यानेही ते व्यथित झाले होते. याविषयीची त्यांच्या मनाची द्वंद्वावस्था 'इंडिया आफ्टर इंडिपेन्टन्स, १९४७-२०००' या १९९९ मध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथात ठळकपणे व्यक्त झालेली दिसते. या अवस्थेचे प्रत्यंतर त्यांच्या 'डेमॉक्रसी: द जे.पी. मूव्हमेंट ॲण्ड द इमर्जन्सी', २००३ या पुस्तकातही दिसून येते. त्यामुळे बिपीन चंद्र हे काँग्रेस पक्षाच्या चुकांचे समर्थन करत, असे म्हणणे रास्त होणार नाही. जमातवादाशी केलेल्या कोणत्याही तडजोडीला ते नेहमी प्रखर विरोधच करत असत, हे मात्र खरे.

२००४ मध्ये बिपीन चंद्रांची 'नॅशनल बुक ट्रस्ट'च्या अध्यक्षपदी निवड झाली. त्या पदावर ते २०१२पर्यंत राहिले. बुक ट्रस्टच्या कामात त्यांनी जीव ओतला आणि कल्पकतेने आणि निष्ठेने त्याच्या प्रकाशनांचा मोठा विस्तार केला. एक अभ्यासक आणि विचारवंत म्हणून त्यांना अनेक सन्मान प्राप्त झाले होते. जवाहरलाल नेहरू विद्यापीठात त्यांची निवृत्तीनंतर सन्माननीय प्राध्यापक म्हणून नेमणूक करण्यात आली. भारत सरकारने 'पद्मभूषण' देऊन त्यांचा गौरव केला. आधीच म्हणाल्याप्रमाणे त्यांची १९८५च्या भारतीय इतिहास परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाली होती.

त्यांच्याशी झालेली माझी पहिली भेट मला चांगलीच आठवते, आम्ही अलिगढमधील एका हॉटेलात चहा पीत होतो. आजूबाजूला माश्या घोंगावत होत्या. वैचारिक विश्वासी असलेली त्यांची विलक्षण निष्ठा, अदम्य उत्साह आणि सहजा सहजी आपलेसे करणारा विनोदी स्वभाव पाहून मी क्षणातच प्रभावीत झालो. स्वत:वरच विनोद करून हसणे, ही तर त्यांची मला चकीत करणारीच गोष्ट होती. कसलेही मतभेद त्यांनी मैत्रीच्या आड येऊ न दिल्याने आमची मैत्री शेवटपर्यंत टिकली. मी आणि माझी पत्नी सायरा, दोघांचेही त्यांच्याशी आणि त्यांची विनम्र आणि हसतमुख पत्नी उषा हिच्याशी घनिष्ट व्यक्तिगत नाते जुळून आले. बिपीन चंद्रांच्या आयुष्याच्या अखेरचे दिवस उषाच्या अनपेक्षित निधनाने अक्षरश: काळवंडून गेले होते. त्यांच्या पूर्वाश्रमीच्या सहकाऱ्यांनी आणि विद्यार्थ्यांनी त्यांना आधार दिला, त्यांची काळजी घेतली तरी त्यांच्या करण्याला मर्यादा होत्याच, बिपीन चंद्र आधुनिक भारताच्या इतिहासाचे वासाहतिक आणि नववासाहतिक दृष्टीने अन्वयार्थ लावायच्या प्रयत्नांना सतत निष्ठापूर्वक विरोध करत राहिले. एवढेच नव्हे तर मार्क्सवादाची कुचेष्टा करणाऱ्या तोतया विचारवंतांचे पितळही ते उघडे पाडत राहिले. मार्क्सवादाशी नंतरच्या आयुष्यात निर्माण झालेले त्यांचे मतभेद हे मूलभूत नव्हे तर दुय्यम स्वरूपाचे होते. त्यांच्या स्मृतीला सर्वांनी वंदावे अशीच त्यांची थोरवी होती.

**(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**

# भारताच्या आण्विक धोरणाचा पर्दाफाश

सुलभा ब्रह्मे

मनमोहन सिंगाच्या पावलावर पावले टाकत पंतप्रधान झाल्याबरोबर नरेंद्र मोदी यांनी भारतामध्ये अणुऊर्जानिर्मितीत हनुमान उडी मारण्यासाठी जोराने धडपड सुरू केली आहे. सप्टेंबर २०१४ या महिन्यात त्यादृष्टीने भरगच्च कार्यक्रम आखण्यात आला आहे. १-२ सप्टेंबरला जपान भेटीत जपानचे पंतप्रधान शिंजो आबे यांच्याबरोबर 'नागरी आण्विक' कराराबाबतची चर्चा झाली, पण त्यामध्ये लक्षणीय प्रगती झाली नाही. ११ मार्च २०११ रोजी जपानमध्ये फुकुशिमा येथे भूंकपामुळे चार अणुभट्ट्यांची वाताहत होऊन किरणोत्साराच्या प्रलयंकारी जपान संकटाने वेढले गेल्यावर तेथील जनतेकडून अणुऊर्जेला एवढा दमदार विरोध संघटित झाला की सरकारला नवीन अणुभट्ट्या उभारण्याचा कार्यक्रम पूर्णपणे रद्द करावा लागला आणि चालू असलेल्या ५० अणुभट्ट्याही बंद कराव्या लागल्या. तेव्हा आता भारताची बाजारपेठ काबीज करण्यामागे जपानी कंपन्या आहेत आणि भाजप सरकार भगवे गालिचे अंथरुन स्वागत करण्यास उत्सुक आहे.

३-५ सप्टेंबर २०१४ दरम्यान ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान टोनी अ‍ॅबट भारतभेटीस आले, तेव्हा ऑस्ट्रेलियाकडून युरेनियम आयातीबाबत वाटाघाटी होऊन आयातीचा करार झाला. सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात चीनच्या अध्यक्षांच्या भारत भेटी दरम्यान 'नागरी आण्विक करार'कार्यसूचिवर आहे. ३० सप्टेंबरला नरेंद्र मोदी अमेरिका भेटीत बराक ओबामा यांच्या समवेत भारत-अमेरिका आण्विक सहकार्य वाढवण्याबाबत चर्चा करतील. अमेरिका, चीन, जपान या देशांबरोबर वाटाघाटी करून भारताच्या अटींवर आण्विक सहकार्य करार करून घेण्याचा मार्ग काटेरी आहे. कारण भारताची आण्विक प्रसारबंदी विषयक जागतिक पातळीवरील करारांमध्ये सामील न होण्याची भूमिका. ती समजण्यासाठी आण्विक प्रश्नाचा धावता इतिहास पाहणे आवश्यक आहे.

## थोडेसे ऐतिहासिक

६ ऑगस्ट १९४५ रोजी जपानमधील हिरोशिमावर अमेरिकेने युरेनियम अणुबॉंबचा हल्ला करून हिरोशिमा जमीनदोस्त केले. १३ चौ. किमी परिसरातले ५०,००० लोक आगीच्या लोळात वाफ होऊन वा भाजून मेले. पुढील काळात दीड लाख लोक किरणोत्सारामुळे क्लेशमय मृत्यूकडे ढकलले गेले. किरणोत्साराचे दूरगामी अनुवंशिक परिणाम अजूनही हिरोशिमावासी भोगत आहेत. ९ ऑगस्टला प्लुटोनियम बॉंबची चाचणी घेण्यासाठी अमेरिकेने नागासाकीवर अणुबॉंबहल्ला करून लाखो बळी घेतले.

सारे जग प्रलयंकारी हल्ल्याने हादरून गेले. या गंभीर प्रश्नाला एकच उत्तर होते–ताबडतोब जगातून अणुबॉंब नष्ट करणे व अणुबॉंबवर बंदी घालणे. २४ जानेवारी १९४६ रोजी युनोच्या जनरल असेंब्लीत ठराव करून 'अ‍ॅटॉमिक एनर्जी कमिशन' नेमले गेले. १९ जून १९४६ रोजी सोव्हिएत युनियनने अण्वस्त्रमुक्तीचा ठराव मांडला, परंतु अमेरिकेने त्याला नकार दिला. परिणामी स्वरक्षणार्थ सोव्हिएत युनियनला अण्वस्त्र निर्मितीकडे वळावे लागले व अण्वस्त्र स्पर्धा सुरू झाली. सप्टेंबर १९४९ मध्ये सोव्हिएत युनियनने अणुबॉंब चाचणी स्फोट केला. १९५२ साली इंग्लंड, १९६० साली फ्रान्स व १९६४ साली चीनने चाचणी स्फोट केला.

अण्वस्त्रांचा प्रसार झपाट्याने सुरू झाल्यामुळे १९७० साली अण्वस्त्र प्रसारबंदी करार करण्यात आला. (Nuclear Non-Proliferation Treaty-NPT) त्या करारान्वये १ जानेवारी १९६७ पूर्वी अण्वस्त्रे बाळगणाऱ्या देशांना (त्यांना P5 असे संबोधले जाते) अण्वस्त्रधारी राहाण्याची मुभा देऊन अन्य सर्व देशांवर अण्वस्त्र निर्मितीवर बंदी लादण्याचा प्रयत्न झाला. पण इस्त्रायल, भारत व पाकिस्तान या देशांनी सदर करारावर सही केली नाही. भारताने १८ मे १९७४ रोजी पोखरण येथे (राजस्थानचे वाळवंट) पहिला अणुबॉंब चाचणी स्फोट केला. त्यामुळे भारताच्या आण्विक ऊर्जा कार्यक्रमात सहकार्य करणाऱ्या अमेरिका, कॅनडा आदी देशांनी त्याबाबतचे सहकार्य बंद केले. अण्वस्त्रधारी देशांची संख्या वाढेल या भीतीने १९९६ साली अमेरिकेने युनोमध्ये सी.टी.बी.टी. (Comprehensive Test Ban Treaty) 'सर्वसमावेशक चाचणी बंदी करार' संमत केला. भारताने याही करारावर सही केलेली नाही. भाजप आघाडी शासनाने ११ व १३ मे १९९८ रोजी अणुबॉंब चाचणी स्फोट केल्यानंतर तर जागतिक पातळीवरील भारतावरील बंधने अधिकच कडक करण्यात आली.

भारतावरील बंधने शिथिल करून घेण्याच्या दृष्टीने २००५ सालापासून भारत-अमेरिका अणु सहकार्याविषयक वाटाघाटी चालू होत्या. जुलै २००७ मध्ये अमेरिका-भारत अणुऊर्जा सहकार्य करार करण्यात आला. कॉंग्रेस आघाडीच्या दृष्टीने हा ऐतिहासिक करार 'आण्विक मुक्ती'चा मार्ग खुला करीत असून भारताच्या ऊर्जा प्रश्नाचे ते उत्तर आहे. भाजपने विरोधी पक्ष म्हणून तोंडदेखला विरोध केला. डाव्या पक्षांचा या करारास कडवा विरोध होता. हा करार म्हणजे भारताच्या सार्वभौमत्वावर आघात आहे अशी विरोधकांनी टीका केली होती.

अमेरिकेबरोबर करार केल्यानंतर पुढची पावले म्हणजे आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेबरोबर स्वतंत्र करार आणि आण्विक साहित्य पुरवठा गटातील देशांची मान्यता. या गटात ४५ देश असून नकाराधिकाराची तरतूद आहे. बरेच चर्चाचर्वण होऊन अमेरिकेच्या दडपणाखाली सहा सप्टेंबर २००८ रोजी आण्विक साहित्य पुरवठा गटाने भारताला सवलत दिली. त्यानंतर हा करार प्रत्यक्ष अंमलात येण्यासाठी अमेरिकी कॉंग्रेसची मान्यता मिळाली व आठ ऑक्टोबर २००८ रोजी त्यावर शिक्कामोर्तब झाले. हे कसे घडवता आले, तर 'अमेरिका, रशिया आणि फ्रान्स यांना आपण (आण्विक तंत्रज्ञान व व्यापारविषयक) निर्बंध उठवण्याच्या प्रयत्नात मध्यस्त केले आणि म्हणून त्यांचे व्यापारी हितसंबंधही जोपासताना त्यांच्याशी अणुऊर्जा प्रकल्पासाठीचे करारही केले.' (डॉ. काकोडकर, सकाळ, ५-१-२०११)

## अणुभट्ट्या खरेदी करार

पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी संसद, राज्य शासने, देशातील जनता या सर्वांना अंधारात ठेवून, अमेरिका, फ्रान्स व रशिया या देशांकडून प्रत्येकी सुमारे दहा हजार मे.वॅ. क्षमतेच्या अणुभट्ट्या खरेदी करण्याचा, डॉ. काकोडकर म्हणतात त्याप्रमाणे 'सौदा' केला. या अणुभट्ट्या किती महाग पडतील, त्या तांत्रिकदृष्ट्या समाधानकारक व सुरक्षित आहेत हे अनुभवांनी सिद्ध झाले आहे काय, निरनिराळ्या देशांतून वेगवेगळ्या

नमुन्याच्या अणुभट्ट्या आयात केल्याने निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीच्या तांत्रिक समस्या कशा सोडवता येतील, देशातील आजच्या अणुवीज निर्मिती क्षमतेच्या आठपट एवढी प्रचंड क्षमता निर्माण करून अणुकचऱ्याची साठवणूक व विल्हेवाट याची सोय कशी व कोठे करायची ? अशा गंभीर प्रश्नांबाबत कोणत्याही प्रकारे अभ्यास न करताच मनमानीपणे पंतप्रधानांनी 'सौदा' केला, त्याचे ओझे भारतीय जनतेने का स्वीकारावे ? पंतप्रधानांनी केलेल्या सौद्याप्रमाणे पुढील आयात अणुवीजप्रकल्प खरेदी करण्याचे केंद्रीय शासनाने ठरवले आहे.

तामिळनाडूतील तिरूनेलवेल्ली जिल्ह्यातील कुडनकुलमनजीक समुद्रकिनारी १००० मे.वॅ. क्षमतेच्या रशियन बनावटीच्या दोन अणुभट्ट्या उभारण्याचे काम २००२ पासून सुरू असून, पहिल्या अणुभट्टीतून व्यापारी वीजनिर्मिती सुरू होण्याच्या मार्गावर आहे. (ऑगस्ट २०१४). तेथे अजून सहा (१२०० मे.वॅ. क्षमता) अणुभट्ट्या उभारण्याची योजना आहे. जैतापूर प्रकल्प- महाराष्ट्रात रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर तालुक्यात जैतापूर बंदरानजिक समुद्रात घुसलेल्या माडबनच्या पठारावर प्रत्येकी १६५० मे.वॅ. क्षमतेच्या सहा अणुभट्ट्या उभारण्याबाबत फ्रेंच कंपनी अरेवाबरोबर करार करण्यात येत आहे. प्रकल्पक्षेत्राभोवती भिंत बांधून प्राथमिक काम सुरू आहे. गुजरातमध्ये मिठीविर्दी व आंध्र प्रदेशात कोवाडा येथे १००० मे.वॅ. क्षमतेच्या ६ अणुभट्ट्या जी.ई.-हिताची किंवा वेस्टींगहाऊसमार्फत उभारण्यासाठी जमीन संपादनाच्या नोटिशी बजावण्यात आल्या आहेत. प्रकल्पाविरोधात जनआंदोलने चालू आहेत.

## जैतापूर अणुवीज प्रकल्प

जैतापूर अणुवीज प्रकल्प प्रारंभीपासूनच वादग्रस्त आहे. प्रकल्पासाठी भूकंप प्रवण क्षेत्र-४ मध्ये येणारे समुद्रात घुसलेले माडबनचे ठिसूळ पठार निवडले आहे. ते किनारपट्टी रक्षण क्षेत्रात येते. पर्यावरणीय दृष्ट्या माडबनचे पठार हे जागतिक पातळीवरील जैवविविधितेत विशेष संपन्न-अतुलनीय परिसंस्था आहे. याबाबत पर्यावरणतज्ज्ञ गाडगीळ म्हणतात, '(वीजनिर्मिती) उद्यानाचा एक प्रस्ताव (जैतापूर अणुवीज प्रकल्प) मी वाचला. त्यात लिहिले होते. जिथे हा प्रकल्प होणार आहे, तो सारा मुलुख उजाड, वैराण आहे. 'सह्याद्रीच्या तळी शोभते हिरवे तळ कोकण, राष्ट्रदेवीचे निसर्ग निर्मित केवळ नंदनवन' अशा परिसराला वैराण ठरवणे हा आहे धादांत खोटेपणा. पण मुंबई-दिल्लीतले दृष्ट्वाचार्य हे विधान खुशाल पचवतात...' (माधव गाडगीळ, सकाळ, १२ नोव्हेंबर २०१०)

## स्ट्रॅटेजिक मंजुरी

जैतापूर परिसरातील जैवविविधता वाचली पाहिजे, ही वस्तुस्थिती २८ नोव्हेंबर २०१० रोजी जैतापूर अणुवीज उद्यानाला हिरवा कंदील देताना पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांनी मान्य केली. तरीही 'स्टॅटेजिक'- राजकीय कारणे पुढे करून प्रकल्पाला मंजुरी दिली. परवानगी देताना घातलेल्या कोणत्याही पूर्वअटींची आजपर्यंत पूर्तता झालेली नाही. यासंबंधी माहितीच्या अधिकाराखाली अणुऊर्जा नियामक मंडळ (AERB) यांच्याकडून २०१४ जूनअखेर पुढील माहिती उपलब्ध झाली.

जैतापूर प्रकल्प स्थान हे अणुभट्ट्या उभारण्यास योग्य आहे किंवा नाही याबाबतची तपासणी व मूल्यांकन प्रक्रिया अजूनही पुरी झालेली नाही आणि प्रकल्प स्थानास मान्यता मिळण्यास किती काळ लागेल याबाबत अणुऊर्जा निगमास अंदाज नाही. प्रकल्प स्थळाबाबत उपलब्ध असलेली माहिती लक्षात घेता शास्त्रशुद्ध पद्धतीने त्याचे परीक्षण केले तर ते अणुभट्ट्या उभारण्यास योग्य ठरेल अशी शक्यता दिसत नाही. किरणोत्साराच्या परिणामाबाबत अभ्यास झालेले नाहीत. एन्रॉनची वीज दहा रुपये युनिट पडत असल्याने इतकी महाग वीज घेणे वीज वितरण कंपनीला परवडत नसल्याने तो प्रकल्प बंद आहे. अणुवीज तर त्याहून बरीच महाग असेल, तेव्हा ती अजिबात परवडण्याजोगी नाही. जैतापूर परिसरातील मच्छीमार, शेतकरी व आम जनता यांचा प्रकल्पाला ठाम विरोध आहेच.

## आण्विक दायित्व कायदा

२०१० साली भारताने आण्विक दायित्व कायदा पारित केला. त्यातील तरतुदींनुसार अणुभट्टीमध्ये अपघात झाला व त्याला पुरवठादार कंपनी जबाबदार आहे असे सिद्ध करता आले (जे महाकठीण आहे) तर अणुभट्टी पुरवठादार कंपनीला नुकसानभरपाई द्यावी लागेल, भरपाईच्या रकमेला १,५०० कोटी रुपयांची कमाल मर्यादा घातलेली आहे. अमेरिकी कंपन्यांना त्यांनी पुरवलेली यंत्रसामग्री, इंधन याबाबत कोणतीही जोखीम नको असल्याने भारताने सदर कायद्यामध्ये अमेरिकी शासनाच्या सूचनांनुसार बदल करावे असे दडपण आहे. आता भाजपचे लोकसभेत तर बहुमत आहे. तेव्हा राज्य सभेत पुरेसा विरोध झाला नाही तर अमेरिकी कंपन्यांच्या सोयीप्रमाणे कायद्यात बदल केले जाण्याचा धोका आहे. भारतीय राज्यकर्त्यांच्या दृष्टीने परकीय कंपन्यांना निमंत्रण देऊन अब्जावधी रुपयांचे प्रकल्प भारतात आणणे एवढे 'लाभकारी' आहे की त्यापुढे किरणोत्साराची घातकता, अणुवीज अवाच्या-सवा महाग पडते, जनतेचा कडवा विरोध आहे हे सारे त्यांच्या खिजगणतीत नाही.

परकीय कंपन्यांबरोबर अब्जावधी रुपये गुंतवणुकीचे महाकाय अणुवीज प्रकल्पांचे सौदे करण्यास राज्यकर्ता वर्ग का हपापलेला आहे हे आपण जाणतोच. त्यामध्ये अंबानी-टाटांसारख्या बड्या भारतीय कंपन्यांना मोठा फायदा दिसतो आणि राज्यकर्त्यांना कमिशने! परंतु प्रकल्पांचे समर्थन मात्र विजेची गरज पुरी करण्याची निकड असे केले जाते. भारनियमन चालू असल्याने ते खरेही वाटते. तेव्हा वीज पुरवठा वाढवण्यासाठी अणुविजेची गरज आहे का हेही तपासण्यास हवे.

## वीजपुरवठा

विजेची रास्त गरज भागवण्याचे अनेक पर्याय भारतास उपलब्ध आहेत. सर्वात महत्त्वाचा व नव्या वीजनिर्मितीसाठी लागणाऱ्या भांडवली खर्चाच्या २० ते २५ टक्के खर्चात विजेची उपलब्धता वाढवण्याचा उत्तम मार्ग म्हणजे कार्यक्षमता वाढ. वीजनिर्मिती, पारेषण, वितरण आणि विजेचा वापर (दिवे, पंखे, उपकरणे, मोटरी, पंप इ.) यातील सुधारणांद्वारा ३० ते ४० टक्के बचत साधता येईल. दुसरा महत्वाचा उपाय म्हणजे रोशनाई, जाहिरातबाजी, वातानुकूलन आदींद्वारा विजेची जी प्रचंड उधळपट्टी चालते त्यावर आळा घालण्यासाठी जादा वीज वापरासाठीच्या वीजदरामध्ये घसघशीत वाढ व वीज वापरावर कमाल मर्यादा लागू करणे. नवीन वीज निर्मितीसाठी कोळशा आधारे, परंतु तो सरळ न जाळता वायूकरण करून वापरल्याने कार्यक्षमता वाढ साधता येते व प्रदूषण किमान होते. हे संयुक्त गॅस तंत्रज्ञान, नैसर्गिक गॅस, जलविद्युत्, पवन, जैविक माल आदी स्त्रोतांमार्फत वीजनिर्मिती क्षमतेत लक्षणीय भर घालता येईल. शिवाय उद्याची ऊर्जा ही सौरऊर्जा हे लक्षात घेऊन त्यावरील संशोधन व वापर यावर भर देऊन २०३० नंतरच्या काळात तो महत्त्वाचा शाश्वत ऊर्जास्त्रोत बनेल. भारताजवळ ऊर्जेची भविष्यातील गरज भागवण्याच्या दृष्टीने असे अनेक अर्थक्षम, सुरक्षित, शाश्वत पर्याय उपलब्ध आहेत. प्रश्न आहे, शासनाला समूचित व जनहितकारी धोरण स्वीकारावयास लावण्याचा! ◻◻◻

# जाती अंतासाठी समतावादी विचारांचे मिश्रणच प्रभावी जी. के. ऐनापुरे यांचे मत

*'माणसाचे रक्त भगवे, हिरवे, निळे नसून ते फक्त लाल आहे. देशात फोफावलेला जातीवाद रोखण्यासाठी आणि जातीवादाच्या चक्कीत हजारो वर्षे पिसल्या गेलेल्या माणसांना स्वाभिमानाचं आणि सन्मानाचं जीवन जगण्यासाठी, तसेच देशात फोफावलेला जातीवाद गाडण्यासाठी फुले, शाहू, आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद तसेच मानवतावादी विचारसरणी सांगणाऱ्या महापुरुषांच्या समतावादी विचारांचे मिश्रणच प्रभावी ठरू शकेल...' सांगली येथे जाती अंत संघर्ष समितीच्या वतीने ५ ऑगस्ट रोजी जाती अंत परिषद झाली. या पार्श्वभूमीवर या परिषदेचे अध्यक्ष प्रा. जी. के. ऐनापुरे यांच्याशी 'लोकमत'ने साधलेला संवाद.*

**★ पुरोगामी महाराष्ट्रात जातीयवाद फोफावण्याची नेमकी कारणे कोणती?**

- धर्मकारण हेच जातीयवादाचे मूळ कारण आहे. देशात धर्मशास्त्र आणि ते ऐकणारे आणि त्याप्रमाणे कृती करणारे यांच्यातील नातेसंबंध इतका घट्ट आहे की, पुरोगामी या शब्दाची व्याप्ती महाराष्ट्रातून हद्दपार होईल की काय? अशी भीती वाटते. पुरोगामीत्वाची स्पेस निर्माण करण्यासाठी या दोघांमध्ये मानवतावादी विचारसरणीचा आधार घेत आपण भिंतीसारखे उभे राहिले पाहिजे. हा समतेचा मार्ग मार्क्स, फुले, आंबेडकर, आगरकर असा जातो. नेमका हाच मार्ग धर्ममार्तंडांनी उचलून विष पेरण्याचे काम केले.



**★ जाती अंताची लढाई करणाऱ्या महापुरुषांच्या विचारांचा पराभव झाला आहे, असे तुम्हाला वाटते का?**

- जाती अंताची लढाई लढणाऱ्या महापुरुषांचा पराभव करण्याचे राजकीय धोरण आपण सर्वांनीच पूर्वीपासून स्वीकारलेले आहे. याला जे अपवाद आहेत, त्यांनी या महापुरुषांना त्यांच्या विचारासह जतन करण्याचे काम इतिहास, इतर काही शास्त्रामधून लावून धरले आहे. इतिहासाकडे मागे वळून पाहणे, हा आपण वैचारिक मध्यमवर्गीय झाल्याचा फार मोठा पुरावा आहे. अशा मध्यमवर्गीयांना चळवळीत स्थान नसते. अशीच परिस्थिती कायम राहिल्यास इतिहासातील आपले स्थान धर्मशास्त्राच्या ओझ्याखाली आपसूकच जाईल, ही भीती मनाशी ठेवूनच आपण क्रियात्मक आणि प्रतिक्रियात्मक झाले पाहिजे. तरच आपल्या महापुरुषांना सन्मान मिळेल.

**★ भूतकाळातील जातीवाद आणि वर्तमानातील जातीवाद यातील तुमच्या दृष्टीने तुलनात्मक फरक काय?**

- पूर्वीचा जातीवाद आणि आताचा जातीवाद यामधील मूलभूत फरक म्हणजे 'शिक्षित अडाणीपणा' होय. पूर्वीच्या जातीवादातील जी एक आत्मियता होती आणि विखारीपणाही होता, तो आता मन्वादी अवस्थेत बदललेला आहे. आरक्षणाची वर्गवारी पाहता, जात ही गोष्ट 'स्वाभिमान' अशा अर्थाने विस्तारताना दिसते आहे. हा आपल्या शैक्षणिक व्यवस्थेचा मोठा पराभव आहे. याचा सर्वात मोठा फटका शिक्षणामध्ये एकवटलेल्या बहुजन समाजाला भविष्यात बसेल. धर्ममार्तंडांना वर्चस्ववादासाठी हीच गोष्ट टोकदारपणे करावयाची आहे आणि जोपासायची आहे.

**★ जाती निर्मूलनासाठी नेमके काय करण्याची गरज आहे? कोणी करण्याची गरज आहे?**

- डॉ. आंबेडकरांच्या 'जात निर्मूलन'या पुस्तकामधील विवेचन पाहता, बाबासाहेबांनी हिंदू धर्माचा त्याग केला असला तरी, हिंदू धर्माकडे ते सकारात्मक दृष्टीकोनातून पाहतात. जाती निर्मूलनाची सर्वात जास्त गरज या धर्माशीच निगडीत आहे, हे आपल्या ध्यानात येते, जातीचा मूळ स्रोत हा धर्माकडेच जातो. म्हणून प्रथम धर्मसुधारणा, मग हळूहळू धर्मनिरपेक्षता, आरक्षण, आर्थिक सुबत्ता, बेरोजगारी, शिक्षण, महिलांचे आरोग्य, कर्मठ विधी आदी गोष्टींकडे गंभीरपणे पहाणे गरजेचे आहे. मनुष्याला स्वत: जात हा घटक विखारी आणि विकृत, उपयोगी नसलेला आहे आणि त्याचा धर्मशास्त्राशी कोणताही संबंध नाही, हे पटवून दिल्याशिवाय जाती निर्मूलनाच्या पुढच्या टप्प्याकडे जाणे अशक्यच आहे. आंबेडकरी विचारधारा मानणारे, डावी विचारधारा अस्तित्वात ठेवणारे यांच्यातील घट्ट संबंधावरच सांस्कृतिक बळ निर्माण होईल.

**★ आंबेडकर आणि मार्क्सवाद यांचा जात या विषयाशी संबंध जोडताना तुम्ही काय म्हणाल?**

– वर्ग आणि वर्ण या दोन्ही गोष्टी मार्क्सवादी आणि आंबेडकरवाद यांच्यात दरी निर्माण करणाऱ्या ठरल्या आहेत. एकमेकांना दोष देण्यापेक्षा मार्क्सवाद्यांनी आणि आंबेडकरवाद्यांनी एकत्रित काम करणे ही काळाची गरज आहे. राज्यातील काही पुरोगामी साहित्यिक व विचारवंतांनी आंबेडकरवाद व मार्क्सवाद या दोन्ही विचारधारा किती एकमेकांच्या जवळ येतात आणि त्या विचारधारांनी एकत्रित येण्याची उपयुक्तता किती महत्वाची आहे, हे सांगण्याचा पुन्हा पुन्हा प्रयत्न केला आहे, हे समजून घेणे ही आपल्या सर्वांसाठीच महत्त्वाची जाणीव ठरावी, असे वाटते.

**★ जाती निर्मूलन या पार्श्वभूमीवर सोशल मीडियाबाबत तुम्ही काय म्हणाल?**

- सद्यस्थितीला देशात सोशल मीडियाचा वेगाने प्रसार झालेला आहे. सोशल मीडियातून होणारा प्रचार आणि प्रसार हा सामजिक एकात्मता जपणारा असावा, असे वाटते. युवा पिढीने सोशल मीडियासारख्या माध्यमातून जातीभेदाची बीजे न पेरता जाती निर्मूलनासाठी काम करावे आणि देशाची एकता टिकविण्याचा प्रयत्न करावा, असे मला वाटते.

□□□

# सेनगाव : मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा मोर्चा





मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने १४ ऑगस्ट रोजी हिंगोली जिल्ह्याच्या सेनगाव तहसिल कचेरीवर ५०० लोकांचा मोर्चा काढण्यात आला. मोर्चा तहसिल कचेरीवर आल्यानंतर पोलिसांनी गेटवर अडवला. मोर्चेकऱ्यांच्या मागणीनुसार तहसिलदारांनी मोर्चेकऱ्यांसमोर येऊन निवेदन स्विकारले.

सेनगाव तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा, गुरांना पिण्याच्या पाण्याची व चाऱ्याची व्यवस्था करा, कोरड्या दुष्काळामुळे दुबार पेरणीसाठी हेक्टरी २५ हजार रुपये अनुदान द्या, सेनगांव तालुक्यातील संजय गांधी निराधार व इंदिरा गांधी योजना, अपंग व श्रावण बाळ योजना यासाठी नवीन अर्ज मंजूर करा, बंद पडलेले पेन्शन वाटप करा, सेनगाव तालुक्यातील गायरान जमिनीचे पट्टे कसणाऱ्यांच्या नावे करा व सातबारा उतारा द्या, भूमिहीन मजुरांना घरकुलाचा लाभ द्या. शेतकऱ्यांचे सर्व कर्ज माफ करा व महिन्याला रॉकेलचे वाटप करा, रॉकेलचा काळा बाजार बंद करा, शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करा, ह्या मागण्या यावेळी करण्यात आल्या. त्यानंतर तहसिलदारांनी शिष्टमंडळासोबत चर्चा केली व चर्चेत त्यांच्या अधिकारातील मागण्या सोडविण्याचे आश्वासन दिले व त्यांच्या कक्षेच्या बाहेरील मागण्या राज्य सरकारकडे पाठविण्याचे आश्वासन दिल्यानंतर मोर्चाचे विसर्जन करण्यात आले.

मोर्चाचे नेतृत्व जिल्हा सेक्रेटरी अंकुश बुधवंत, जिल्हा कमिटी सदस्य नाथेराव शिंदे, संदिप नवघरे, दिनकरराव शिंदे, किसनराव कव्हळे यांनी केले.

**– नाथराव शिंदे**

# तेलगाव-सोलापूर बस सेवा एस.एफ.आय.मुळे पूर्ववत

स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया सोलापूर जिल्हा कमिटीच्या वतीने तेलगाव-सोलापूर बस सेवा बंद केल्यामुळे परिवहन मंडळाला १२ ऑगस्ट रोजी निवेदन देण्यात आले. निवेदनात पुढील मागण्या मांडण्यात आल्या. तेलगाव व सोलापूर बस सेवा बंद झाल्यामुळे तेलगाव, भंडारकवठे, निंबर्गी, मंद्रूप तेरामैल आणि परिसरातील शेकडो विद्यार्थ्यांना आपले शिक्षण सोडून घरी बसावे लागत आहे. यामुळे तेलगाव-सोलापूर बससेवा पूर्ववत करा, सकाळच्या शाळा व महाविद्यालयाला जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तेलगाव येथे मुक्कामी बसेसची सोय करा, मुलींसाठी विशेष बस संपूर्ण जिल्ह्यात लवकरात लवकर सुरू करा.

तसेच तेलगावमधील विद्यार्थी, पालक व सरपंच यांनीही बससेवा पूर्ववत सुरू ठेवण्यासंदर्भात अनेकदा परिवहन मंडळाला विनंती अर्ज करूनही त्याची दखल घेण्यात आली नाही. उलट रस्ता अतिशय खराब असल्याचे कारण पुढे करून बससेवा बंद करण्यात आली. परंतु या रस्त्याची मुरूम टाकून दुरुस्ती करण्यात आली आहे. त्याचे पत्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घेऊन या अशी उडवाउडवीची उत्तरे परिवहन मंडळाकडून देण्यात आली. या भागातील पक्का रस्ता आजतागायत करण्यात आला नाही. त्यामुळे बससेवा बंद होऊन विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आपल्यामुळे काही अडचण येऊ नये, याचा परिवहन मंडळाने कधीही दृष्टीकोन ठेवला नाही.

संघटनेच्या वतीने १२ ऑगस्टला निवेदन देऊन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्याचे मुरूम टाकून झाल्याचे प्रमाणपत्र घेऊन परिवहन मंडळाला देण्यात आले. त्यानंतर मंडळाकडून १८ ऑगस्ट २०१४ पासून बस सेवा सुरू करण्यात आली. संघटित काम केल्याची शक्ती कळल्याने तेलगावच्या विद्यार्थ्यांनी संघटनावाढीचा ठाम निर्धार केला.

निवेदन देताना जिल्हा अध्यक्ष किशोर झेंडेकर, जिल्हा सचिव नम्रता निली, मीरा कांबळे, राहुल जाधव, अमोल केंदळे, महेश सुतार तसेच तेलगाव आणि परिसरातील अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

**– नम्रता निली**

**आगामी विधानसभा निवडणुकीत सर्वशक्तीनिशी उतरून**
**महाराष्ट्र डाव्या लोकशाही समितीला अधिकाधिक ठिकाणी विजयी करा!**

# नागपूर : विदर्भातील माकप कार्यकर्त्यांची बैठक

पूर्वीचीच काँग्रेसची दिवाळखोर आर्थिक धोरणे पुढे रेटत असल्याचे संकेत केंद्रातील भाजप सरकारकडून मिळत असल्याने जनतेची तीव्र, व्यापक आणि सातत्याची आंदोलने केल्यास पक्षकार्य पुढे नेता येऊ शकते असे स्पष्ट मार्गदर्शन माकपचे राज्य सचिव डॉ. अशोक ढवळे यांनी विदर्भातील पक्ष कार्यकर्त्यांना संबोधित करताना नागपूर येथे २४ ऑगस्ट २०१४ रोजी केले. ऑगस्ट महिन्यात पार पडलेल्या माकपच्या केंद्रीय कमिटी बैठकीचे रिपोर्टिंग ते करीत होते.

ते म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत जरी भाजपचे सर्वात जास्त खासदार निवडून आले तरी भाजपला केवळ ३१ टक्केच मतदान झाले. काँग्रेसला आजवरच्या सर्वात निचांकी आकड्यावर समाधान मानावे लागले. भाजपच्या विजयाची कारणे सांगताना डॉ. अशोक ढवळे म्हणाले की, महागाई व भ्रष्टाचारामुळे युपीए सरकारच्या विरोधात असणारा असंतोष, उद्योगपतींची मोदींच्या भोवती झालेली एकजूट, मध्यमवर्ग व तरुणांमध्ये सोशल मिडीयामधून भाजपने केलेला प्रचार, पण त्याचबरोबर भाजपची नैपथ्यरचना (मोदींनी फक्त विकासाच्या बाबतीत बोलावे व इतर सांप्रदायिक मुद्दे अमित शहांसारखे नेते व संघाच्या कार्यकर्त्यांनी जनतेपर्यंत पोहचवावे), निवडणुकीवर केलेला अवाढव्य खर्च यामुळे भाजपला विजय मिळविता आला. बंगालमधील माकपच्या पराभवाबाबत बोलताना ते म्हणाले की, पक्षाविरुद्ध झालेल्या प्रचंड दडपशाहीबरोबरच, नरेंद्र मोदींनी बांगलादेशी घुसखोरीचा मुद्दा काढल्याने मतांचे ध्रुवीकरण झाले, राज्य सरकार तृणमूलचे असल्याने अल्पसंख्याकांच्या मनात तृणमूल संरक्षण देईल असा समज झाला व त्याचा फटका डाव्यांना बसला.

'आप'विषयी बोलताना त्यांनी सांगितले की, केजरीवाल यांनी एनजीओच्या मार्फत केलेले दीर्घकालीन कार्य आणि भ्रष्टाचाराविरुद्ध तसेच जनतेच्या प्रश्नांवर सतत उठवलेला आवाज यामुळे त्यांना दिल्लीत यश मिळवता आले. पण धोरणांबाबत स्पष्टता नसल्याने लोकसभा निवडणुकीत मात्र ते यश कायम राखता आले नाही. त्यांनी स्पष्ट केले की, 'आप' हा देखिल भांडवली पक्ष आहे असे तो स्वत:च कबूल करतो, म्हणून तो डावा असेल असे समजून कार्यकर्त्यांनी गफलतीत राहू नये.

नंतर त्यांनी मोदी सरकारने केलेली रेल्वे भाववाढ, पेट्रोल डिझेलची भाववाढ, वाढती महागाई, केंद्रीय अर्थसंकल्पात शेती, ग्रामीण विकास, मनरेगा, समाजकल्याण व महिला-बाल कल्याण या खात्यांमध्ये केलेली घसघशीत कपात, कामगार कायद्यांत प्रतिगामी बदल यावर प्रकाश टाकला व येत्या काळात होणारी माकपची पक्ष अधिवेशने, माकपचे ५० वे वर्धापन वर्ष यासंदर्भाने प्रचार अभियान चालविण्याचे आवाहन केले. त्यांच्या रिपोर्टिंगनंतर प्रश्नोत्तरे झाली. माकपचे राज्य सचिवमंडळ सदस्य प्रा. उदयन शर्मा यांनी कार्यक्रमाची अध्यक्षता केली तर माकपचे राज्य सचिवमंडळ सदस्य मनोहर मुळे यांनी प्रास्ताविक केले.

त्यानंतर नागपूरच्या कॉ. ए. के. गोपालन भवनात विदर्भातील माकपच्या सर्व जिल्हा कमिटी सदस्यांची बैठक पार पडली. त्यास ९ जिल्ह्यांतील ७७ कार्यकर्ते हजर होते. अमरावतीचे सुभाष पांडे, यवतमाळचे शंकरराव दानव, बुलढाण्याचे दादा रायपुरे, नागपूरचे मनोहर मुळे, वर्ध्याचे यशवंत झाडे, चंद्रपूर-गडचिरोलीचे प्रा. रमेशचंद्र दहीवडे, गोंदियाचे महेंद्र वालदे, भंडाऱ्याचे मनोहर रंगारी यांनी जिल्हा सेक्रेटरी या नात्याने आपापल्या जिल्ह्याचे अहवाल मांडले. त्यातून अनेक जिल्ह्यातील चांगल्या कार्याचा अनुभव इतर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शक झाला.

बैठकीस मार्गदर्शन करताना डॉ. अशोक ढवळे यांनी विदर्भाच्या विकासाचा ज्वलंत व प्रलंबित प्रश्न, विदर्भात झालेल्या कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या, लोकसभा निवडणुकीत भाजपने यंदा विदर्भात मारलेली मुसंडी यांचा परामर्श घेऊन विविध जिल्ह्यांतील पक्ष व जनसंघटनांच्या कार्याचा समन्वय साधून पक्ष पुढे नेण्याचे आवाहन केले. त्यांनी पुढील चार कार्ये सर्व प्रतिनिधींसमोर ठेवली :- १) आगामी विधानसभा निवडणुकीत अधिकाधिक चांगली कामगिरी करणे अणि निवडणूक न लढणाऱ्या जिल्ह्यांनी अधिकाधिक निधी जमा करून देणे; २) डिसेंबर अखेरपर्यंत प्रत्येक जिल्ह्याने लोकांच्या स्थानिक प्रश्नांवर पूर्ण ताकद लावून एक तरी मोठे आंदोलन उभारणे, त्यात विदर्भाच्या विकासाचे रास्त मुद्दे लावून धरणे; ३) सर्व जनसंघटनांची सभासदसंख्या डिसेंबर अखेरपर्यंत मोठ्या प्रमाणात वाढविणे; ४) आगामी पक्ष अधिवेशनांमध्ये युनिटपासून जिल्ह्यापर्यंत पक्ष संघटनेची बांधणी जास्त भक्कम, सक्रिय व रेखीव करणे. ही विदर्भस्तरीय बैठक उत्तमरित्या आयोजित केल्याबद्दल त्यांनी पक्षाच्या नागपूर जिल्हा कमिटीचे विशेष अभिनंदन केले. या बैठकीला कार्यकर्त्यांनी उत्साहात प्रतिसाद दिला. पुढे अशाच बैठका नियमितपणे आयोजित करण्याच्या संकल्पात ही बैठक घोषणांच्या गजरात पार पडली.

**– अरुण लाटकर**

---

**(पोटनिवडणुकीचे निकाल...पान ५ वरून)**

किंमत मोजावी लागली आहे. 'आमच्या हिंदुत्ववादी कार्यक्रमामुळेच आम्हाला २०१४च्या लोकसभा निवडणुकीत इतके मोठे यश मिळाले, ही वस्तुस्थिती आहे. आमची ही खरी अस्मिता आम्ही विसरून आणि सर्वसमावेशक राजकारण करू लागलो की आम्हाला पराभव चाखावा लागतो.' (मेल टुडे, १७ सप्टेंबर २०१४)

अशा रीतीने भाजपचे पितळ उघडे पडले आहे. या आधीच्या अग्रलेखांतून आम्ही वारंवार भाजपच्या दोन तोंडांनी बोलायच्या प्रवृत्तीचे वस्त्रहरण केले आहे. लोकांना भुलवण्यासाठी एका बाजूला 'विकास', 'गुजरात मॉडेल' आणि 'अच्छे दिन'ची भाषा करायची आणि दुसरीकडे निवडणुकीत मतांची लूट करण्यासाठी धार्मिक तणाव आणि उन्माद भडकवायचा असा चेहरा-मुखवट्याचा तमाशा भाजप करत आला आहे. या पोटनिवडणुकीत तर हे ढळढळीतपणे उघड झाले आहे.

खरा धोका आहे तो यात. एका मागोमाग होत चाललेल्या पराभवांमुळे भाजप कट्टर हिंदुत्वाचा कार्यक्रम कवटाळत राहील हे उघड आहे. तोच त्याच्या राष्ट्रीय राजकारणाचा दीर्घकाळ टिकणारा आधार राहील. असा रा.स्व. संघ-भाजपचा समज जास्तच बळकट होत आहे. आपल्या आधुनिक धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताक भारत देशासमोरील हे फार मोठे संकट आहे. भारतीय जनतेला या संकटाशी धाडसाने आणि हिंमतीने थेट दोन हात करावेच लागतील, धार्मिक उन्माद पसरवणाऱ्या शक्तींना पराभूत करावेच लागेल. आपल्या धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताकाचे रूप बदलून त्याचे रानटी फॅसिस्ट हिंदुराष्ट्र करायचे त्याचे प्रयत्न उधळून लावावेच लागतील, आपल्या भारताचा धर्मनिरपेक्ष लोकशाही पाया बळकट करू शकलो तरच आपल्याला सर्व भारतीयांचे भवितव्य उज्ज्वल करायची निर्णायक लढाई छेडता येईल.

**(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**